पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/५००/२०१२
दिनांक- २४/०५/२०१२

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २९.५.२०१२ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २९.५.२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
<u>कार्यपत्रिका क्रमांक- ८</u>

दिनांक- २९.५.२०१२ वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २९/५/२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक २२/५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ७) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) मा.विधी समिती सभा दिनांक ७/५/२०१२ ठराव क्र.७ नुसार, नवीन दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्ठाप्रमाणे आवश्यक अशी पदे निर्माण करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २९.५.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील उच्चदाब वीज संच मांडणीचे सन २०११-१२ करीताचे वार्षिक निरिक्षणापोटी निरिक्षण शुल्क र.रू.४३,२००/- [र.रू.त्रेचाळीस हजार दोनशे] मा.विद्युत निरिक्षक, पुणे यांस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र ‘अ’ मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १६/५/२०१२ रोजी ठराव क्र.७ नुसार, पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्ट्स असोसिएशन यांना आंतरकचेरी कबड्डी, कॅरम (पुरुष),कॅरम (महिला),हॉकी,बुध्दीबळ,लॉन टेनिस,फुटबॉल जलतरण या ८ खेळांच्या स्पर्धा आयोजित करणेकामी आर्थिक पुरस्कार देण्यासाठी पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्ट्स असोसिएशन यांना एकूण आर्थिक सहाय्य र.रु.१,३२,६००/- (अक्षरी र.रु.एक लाख बत्तीस हजार सहाशे) अदा करणेस व सदरचा खर्च

क्रीडा निधीमधील वार्षिक क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ५) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १६/५/२०१२ रोजी ठराव क्र.८ नुसार, पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील विविध क्रीडा प्रकारातील विविध प्रकारचे खेळाडू अतिशय मेहनती व होतकरु असून विविध खेळांमध्ये कौशल्य प्राप्त करीत असतात. शहरातील या गुणी खेळाडूंना परदेशात प्रशिक्षण किंवा स्पर्धेत भाग घेणेसाठी निवड होते. परंतु हे सर्व खेळाडू सर्वसामान्य कुटूंबातील असल्यामुळे व आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे कौशल्य असूनही त्यांना परदेशात जाणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेण्यापासून वंचित राहतात व गुणवत्ता असूनही केवळ आर्थिक बाबींमुळे ते मागे पडतात. त्यामुळे सांघिक खेळातील खेळाडूंना प्रत्येकी र.रु.५,०००/- वैयक्तिक खेळासाठी खेळाडूस र.रु.१०,०००/- आर्थिक मदत देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे एप्रिल २०१२ मधिल अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणे.

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/५००/२०१२
दिनांक : २४/०५/२०१२ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.